ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.519
YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal
July-Aug-Sept 2024
Vol. 13 No. 3

# शेतकरी कामगार पक्षाची महाराष्ट्र कर्नाटक –सीमा प्रश्नाविषयी भूमिका

**वर्षा प्रकाश आसबे**

*संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*

*Corresponding Author:* वर्षा प्रकाश आसबे

DOI - 10.5281/zenodo.14684692

**प्रास्ताविक:**

भारतीय स्वातंत्र्य प्राप्तीसाठी मोठी चळवळ उभी राहिली. या चळवळीत अनेक महान नेतृत्वानी योगदान दिले. त्यातून भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्योत्तर काळातही राज्यांच्या रचनेवरून भारतात पुन्हा अनेक चळवळी निर्माण झाल्या. या चळवळीत महाराष्ट्र निर्मितीची चळवळ अत्यंत महत्त्वाची आहे. अनेकांनी महाराष्ट्र निर्मितीसाठी बलिदान दिले. विविध संघटनांबरोबर विविध राजकीय पक्षांनीही संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी अनेक आंदोलने उभारली. महाराष्ट्र निर्मितीसाठी कम्युनिस्ट पक्ष, सोशालिस्ट पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, रिपब्लिकन पक्ष, काँग्रेस अंतर्गत असणारे विविध गट यांनी सुरुवातीच्या काळात आंदोलने उभारली. आज महाराष्ट्र निर्मितीला ६४ वर्ष होऊन सुद्धा बेळगाव-कारवारचा प्रश्न सुटलेला नाही. तो भाग महाराष्ट्रात सामील करण्यासाठी शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व याबरोबरच विविध राजकीय पक्ष आंदोलने करीत आहेत. तसेच विविध राजकीय नेतृत्वाकडून आणि राजकीय पक्षांकडून सीमा प्रश्नांविषयीची भूमिका स्पष्ट होत आहे. विविध नेत्यांनी विधिमंडळात सीमा प्रश्नांची मांडणी करून आपली भूमिका स्पष्ट केली आहे. या सर्वांमध्ये शेतकरी कामगार पक्षाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी करण्यासाठी 'शेतकरी कामगार पक्षाची महाराष्ट्र – कर्नाटक सीमा प्रश्नाविषयी भूमिका' हा विषय निवडला आहे.

**कीवर्ड - सीमा प्रश्न, चळवळ, राजकीय पक्ष, नेतृत्व, स्वातंत्र्य, आंदोलने.**

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये:**

प्रस्तुत शोधनिबंधाचे लेखन करताना पुढील उद्देश ठेवले आहेत.

१. महाराष्ट्र – कर्नाटक सीमा प्रश्नाचे अध्ययन करणे.
२. महाराष्ट्र – कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्यासाठी शेतकरी कामगार पक्षांकडून केलेल्या आंदोलनांचा अभ्यास करणे.
३. महाराष्ट्र – कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्यासाठी शेतकरी कामगार पक्षांकडून सीमा प्रश्नांविषयीची घेतलेल्या भूमिकांचे अध्ययन करणे.

**राजकीय पक्षांच्या भूमिकेची पार्श्वभूमी:**

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी संपूर्ण मराठी जनता एकत्रित आली होती. मराठी जनतेने विविध संघटना व राजकीय पक्षांच्या माध्यमातून महाराष्ट्र निर्मितीसाठी अनेक लढे दिले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाची पुनर्रचना भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वानुसार केली जावी, हे काँग्रेस पक्षानेसुद्धा मान्य केले होते. त्यानुसार देशभर भाषावार प्रांतरचना करण्यास सुरुवात झाली. भाषिक प्रांतरचनेनुसार आंध्र प्रदेश हे पहिले राज्य निर्माण झाले. त्यावेळी आंध्रप्रदेश निर्मितीत काही त्रुटी राहून गेल्या. परिणामी त्याविरोधात चळवळ उभा राहिली. महाराष्ट्र निर्मितीवेळीसुद्धा बेळगाव, कारवार, खानापूरचा भाग महाराष्ट्रात सामील झाला नाही. तत्पूर्वी संयुक्त महाराष्ट्र निर्मितीवेळी अनेक आंदोलने होऊन महाराष्ट्राची सीमा निश्चित करण्याविषयी मागणी करण्यात आली होती. पुढे महाराष्ट्रातील अनेक मंत्र्यांनी महाराष्ट्र निर्मितीसाठी राजीनामे दिले. आंदोलनाने हा प्रश्न सुटत नाही, म्हणून विविध संघटनांनी राजकीय पक्षांच्या माध्यमातून निवडणुका लढविण्याचे ठरविले. त्यांना निवडणुकात काहीअंशी यशही मिळाले. परंतु सीमाप्रश्न सुटू शकला नाही.

**शेतकरी कामगार पक्षाने सीमा प्रश्नाविषयी उभारलेली आंदोलने व भूमिका:**

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी पर्यायाने सीमा प्रश्न सोडवणुकीसाठी विविध राजकीय पक्षांनी आंदोलने उभारली. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे आहे.

**१. शेतकरी कामगार पक्षाने सीमा प्रश्नाविषयी उभारलेली आंदोलने:**

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी शेतकरी कामगार पक्षाने स्वतंत्र व संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सहाय्याने विविध आंदोलने उभारली. ती पुढीलप्रमाणे आहेत.

**i. कारवार सभा, १९६३:**

शेतकरी कामगार पक्षाने बेळगाव तालुक्यातील कार्यकर्त्यांची सभा २६ ऑक्टोबर १९६३ मध्ये आयोजित केली. या सभेचे अध्यक्ष येलुरचे तत्कालीन सरपंच उमाजीराव तोपिनकट्टी हे होते. या सभेत पुढील ठराव करण्यात आले.

- सध्या तांत्रिकदृष्ट्या बेळगाव तालुका म्हैसूर राज्यात समाविष्ट केला असला तरी बेळगाव हा महाराष्ट्राचा अविभाज्य भाग आहे. म्हणून बेळगाव तालुक्यातील सर्व जनतेने भावी काळात काढल्या जाणाऱ्या मोर्चामध्ये सहभागी व्हावे.
- महाराष्ट्र एकीकरण समितीने शिफारस केल्याप्रमाणे १ नोव्हेंबर यादिवशी सीमाभागात हरताळ पाळण्यात शेतकरी कामगार पक्ष सहाय्य करेल. यावेळी बेळगाव-कारवार बिदर जिल्ह्यातील मराठी प्रदेश महाराष्ट्रात सामील करण्याची मागणी करण्यात येईल. यावेळी कारवार महाराष्ट्रात समाविष्ट करण्याच्या मागणीला प्राधान्य दिले जाईल.

- शेतकरी कामगार पक्ष मराठी भाग महाराष्ट्रात सामील करून घेण्यासाठी मध्यमवर्गीय जनतेला संघटित करेल. अशा प्रकारचे विविध ठराव कारवारच्या सभेत करण्यात आले. थोडक्यात शेतकरी कामगार पक्ष तालुका व जिल्हा पातळीवर महाराष्ट्र निर्मितीसाठी आराखडे तयार करीत असल्याचे दिसते.

**ii. लोकप्रतिनिधींचे राजीनामे, १९६६:**

महाराष्ट्र एकीकरण समिती व शेतकरी कामगार पक्षाची सभा ४ ऑक्टोबर १९६६ मध्ये बेळगाव येथे श्री. पी. एस. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. शेतकरी कामगार पक्ष व महाराष्ट्र एकीकरण समितीने मराठी जनतेचे प्रश्न सोडविण्यासंदर्भात सरकार अपयशी ठरत आहे, सरकारकडून सीमाप्रश्न सोडविण्यास दिरंगाई होत आहे म्हणून १५ ऑक्टोबर रोजी लोकप्रतिनिधींनी राजीनामे देण्याचे ठरवले.२ १५ ऑक्टोबर १९६६ रोजी ठरल्याप्रमाणे लोकप्रतिनिधींनी आपले राजीनामे दिले. राजीनामे देताना दिलेल्या निवेदनात लोकप्रतिनिधींनी असे मत मांडले की, गेली १० वर्षे विधीमंडळात मराठी जनतेचे आम्ही प्रतिनिधित्व करीत आहोत. आम्ही मराठी जनतेच्या मागण्या सभागृहात वारंवार मांडल्या, परंतु शासकीय पातळीवरून त्यास कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद मिळाला नाही.३ थोडक्यात 'सीमाभागातील जनतेच्या इच्छा सीमा प्रश्न सोडविताना विचारात घ्याव्यात' या भूमिकेसाठी लोकप्रतिनिधींनी राजीनामे देण्याचे ठरवले.

**iii. सीमाप्रश्नाबाबत ठराव, २००१:**

ऑक्टोबर २००१ मध्ये शेतकरी कामगार पक्षाची बैठक पार पडली. या बैठकीत भाषावार प्रांतरचनेनंतर सीमाभागातील मराठी भाषिक प्रदेश कर्नाटकात जबरदस्तीने समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे सीमाभागातील मराठी भाषिक जनतेने उपोषण, आंदोलने या मार्गाने लढा दिला आहे. या लढ्यासाठी अनेक राजकीय पक्षांचे सहकार्य मिळाले आहे, परंतु हा प्रश्न सुटलेला नाही. सद्यपरिस्थितीत या प्रश्नाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख यांनी चालना दिली आहे. ५ सदस्यांची कमिटी नेमून त्यांच्याद्वारे सीमा प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने पावले उचलली आहेत. तरी शेतकरी कामगार पक्षाने आग्रही भूमिका घेऊन वेळप्रसंगी केंद्र सरकारवर दडपण आणून सीमाप्रश्न विनाविलंब सोडवून घ्यावा४ असा ठराव करण्यात आला. थोडक्यात शेतकरी कामगार पक्षाने सीमाप्रश्न सोडविण्यासाठी आग्रही भूमिका घेतल्याचे दिसते.

**iv. सर्वपक्षीय बैठक – कोल्हापूर, २००५:**

शेतकरी कामगार पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय कम्युनिस्ट पक्ष व महाराष्ट्र एकीकरण समितीच्यावतीने कोल्हापूर येथे सीमाप्रश्न सोडविण्यासाठी डिसेंबर २००५ मध्ये बैठक पार पडली. या बैठकीत शेतकरी कामगार पक्षाचे नेते एन. डी. पाटील म्हणाले की, 'लोकशाहीच्या सनदशीर मार्गाने सीमाप्रश्न सोडविण्यासाठी मराठी भाषिक जनता प्रयत्न करीत आहे. परंतु कर्नाटक सरकार चर्चा करण्यासही तयार नाही. परिणामी हा

प्रश्न आपण न्यायालयात सोडविणार आहोत. कर्नाटक सरकार व केंद्र सरकार यांना आपण प्रतिवादी केले आहे’. ही न्यायालयीन प्रक्रिया सुरू असताना बेळगाव महापालिका बरखास्त करण्यात आली. तसेच मराठी महापौरांना मारहाण करुन काळे फासण्यात आले. कर्नाटकची ही भूमिका चुकीची आहे. या सर्व गोष्टी आपण न्यायालयात सादर केल्या पाहिजेत. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे खासदार सदाशिव मंडलिक यांनी असे प्रतिपादन केले की, ‘सीमाप्रश्नाच्या सोडवणुकीसाठी आपण खासदारकीचा त्याग करायला तयार आहोत’. सीमा प्रश्न सोडवणे हा आता आपल्या लढ्याचे अंतिम पर्व आहे. सर्वांनी एकीचे दर्शन घडवावे. न्यायालयाकडूनही या सुनावणीला विलंब होऊ नये, म्हणून सीमा लढ्याची चळवळ अधिक तीव्र करणे गरजेचे आहे. कॉ. गोविंद पानसरे यावेळी म्हणाले की, ‘खेडे हा घटक, बहुभाषिकता व भौगोलिक सलगता हे भाषावार प्रांत रचनेचे मूळ सूत्र आहे. त्यानुसार आपण करत असलेली मागणी ही शास्त्रीय आहे. भाषिक अल्पसंख्यांकांना सन्मानाने वागवणेची तरतूद संविधानात असतानासुद्धा कर्नाटक सरकार चुकीचे वर्तन करत आहे.’५ थोडक्यात शेतकरी कामगार पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष यांनी एकत्र येऊन सीमाप्रश्न जलदगतीने सोडविण्यासाठी प्रयत्न केले.

**v. काळा दिन, १ नोव्हेंबर २००६:**

शेतकरी कामगार पक्षाने खानापूर, निपाणी, कारवार, बिदर, भालकी व संतपुर या सीमाभागात कर्नाटक राज्य निर्मिती दिनाच्या विरोधात १ नोव्हेंबर हा ‘काळा दिवस’ म्हणून हरताळ पाळला. सीमा भागात काही ठिकाणी मोर्चे काढण्यात आले. या मोर्चावर कर्नाटक पोलिसांनी लाटी हल्ला केला. तर काही ठिकाणी सायकल फेरीसाठी सरकारने परवानगी दिली नाही. बेळगाव शहरात एन. डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेका पक्षाने मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीचे पुढे सभेत रूपांतर झाले या सभेत एन. डी. पाटील म्हणाले की, आत्मिक बळाचा वापर करून महात्मा गांधीजींनी सत्याची बाजू समोर आणली. सत्याग्रहाचे महत्त्व भारतीय स्वातंत्र्य चळवळीत पुरेपूर वापरून त्यांनी भारतास स्वातंत्र्य मिळवून दिले. याच गांधीजींच्या मार्गाने आपण लढा देऊन सीमाभाग महाराष्ट्रात सामील करून घ्यावयाचा आहे.६ थोडक्यात सीमा प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी महात्मा गांधींनी वापरलेल्या स्वातंत्र्य चळवळीतील तंत्रांचा वापर करण्याचे धोरण शेतकरी कामगार पक्षाने ठरवले.

**vi. सर्वपक्षीय धरणे आंदोलन, २००६:**

१७ एप्रिल २००६ रोजी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना व शेतकरी कामगार पक्ष या पक्षांनी एकत्र येऊन मुंबई येथे ‘धरणे आंदोलन’ केले. या धरणे आंदोलनात केंद्र सरकारच्या चुकीच्या भूमिकेचा निषेध करण्यात आला. तसेच सीमाप्रश्नाच्या सोडवणुकीसाठी महाराष्ट्र विधानसभा व विधान परिषदेचे कामकाज एक दिवस स्थगित करण्यात आले. तर विविध पक्षांच्या नेत्यांनी महाराष्ट्र विधानसभेत 'बेळगाव कारवारसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' अशा घोषणा दिल्या.७ यावरून असे दिसून येते की,

महाराष्ट्रातील राजकीय पक्ष सीमाप्रश्न सोडविण्यासाठी संसदीय मार्गाचा वापर करत आहेत.

**२. शेतकरी कामगार पक्षाची सीमा प्रश्नाविषयीची भूमिका:**

बेळगांव, कारवार, बिदर व गुलबर्गा या जिल्ह्यांतील महाराष्ट्राला सलग असलेला व भाषिक, सांस्कृतिक, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या महाराष्ट्राचा अविभाज्य भाग असलेला ८१४ खेड्यांचा मराठी भाषिक प्रदेश गेली दहा वर्षे म्हैसूर राज्यांत ठेवण्यात आला आहे. हा भाग मैसूरमध्ये ठेवताना लोकशाहीचे सर्व संकेत व तेथील जनतेची इच्छा पायदळी तुडवली आहे. हा भाग महाराष्ट्रांत समाविष्ट व्हावा म्हणून या जनतेने १० वर्षात जे लढे उभारले त्या सर्व लढयांत शेतकरी कामगार पक्षाने अग्रभागी राहून येथील जनतेला साथ दिली आहे.

शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी व आमदारांनी या लढयांत म्हैसूर सरकारच्या तुरुंगात शिक्षा भोगल्या आहेत. महाराष्ट्र सरकार व महाराष्ट्र विधिमंडळ यानी बेळगांव, कारवार, बिदर हा भाग येत्या सार्वत्रिक निवडणुकीच्या आत महाराष्ट्रांत सामील केला जाईल असे ठरावरूपाने आश्वासन दिले होते. परंतु महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस व महाराष्ट्र सरकार यानी हे आश्वासन पाळले नाही. कायदेमंडळाने एकमताने पास केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करण्याचे टाळून महाराष्ट्र सरकार व काँग्रेस आमदार यानी विधानसभेची प्रतिष्ठा मलीन केली आहे. अशा स्थितीत मराठी जनतेने आपल्या संघटित ताकदीच्या जोरावरच महाराष्ट्र सरकारला आणि पर्यायाने केंद्र सरकारला वठणीवर आणून संयुक्त महाराष्ट्राप्रमाणेच वरील मागणी मान्य करायला राज्यकर्त्यांना भाग पाडले पाहिजे. या निर्धाराने शेतकरी कामगार पक्षाने महाराष्ट्रातील सर्वच राजकीय पक्षांना व व्यक्तींना या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. या आवाहनातून संपूर्ण महाराष्ट्र समितीची स्थापना झाली. संपूर्ण महाराष्ट्र समितीच्या नेतृत्वाखाली मराठी जनतेने या प्रश्नावर राज्यव्यापी आंदोलने उभारली. संपूर्ण महाराष्ट्र समितीच्या आदेशानुसार २४ ऑगस्ट १९६६ रोजी महाराष्ट्राचे सचिवालय मराठी जनतेने बंद पाडले. संपूर्ण महाराष्ट्र समितीने आपल्या घटक पक्षाच्या आमदारांना या प्रश्नावर आमदारपदाचे राजिनामे देण्याचा आदेश दिला. त्यानुसार संपूर्ण महाराष्ट्र समितीला मानणाऱ्या सर्व आमदारानी २ ऑक्टोबर १९६६ रोजी आपल्या आमदारपदाचे राजिनामे दिले. थोडक्यात सीमा प्रश्नावर मराठी जनतेच्या भावना किती तीव्र आहेत. हे राज्यकर्त्यांच्या निदर्शनास त्यांनी आणून दिले.

'लोकप्रतिनिधींचे राजीनामे' या आंदोलनावर तोडगा म्हणून तत्कालीन सत्तारूढ पक्ष काँग्रेसने व भारत सरकारने मेहेरचंद महाजन यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमले. महाराष्ट्र काँग्रेस व महाराष्ट्र सरकार यानी महाजन कमिशनचे स्वागत केले. परंतु संपूर्ण महाराष्ट्र समितीने या महाजन आयोगास मान्यता देण्यास नकार दिला आहे. महाराष्ट्र काँग्रेस आणि संपूर्ण महाराष्ट्र समिती यांच्या भूमिकांत मूलभूत मतभेद आहे. महाजन कमिशन देईल तो निवाडा मान्य करण्याची

काँग्रेसची भूमिका आहे. या उलट खेडेगांव हा घटक धरून, '१९५१ च्या शिरगणतीप्रमाणे भौगोलिक सलगतेच्या तत्त्वावर सीमा भागांतील मराठी प्रदेश महाराष्ट्रांत समाविष्ट झालाच पाहिजे' ही संपूर्ण महाराष्ट्र समितीची मागणी आहे.६ शेतकरी कामगार पक्षाची हीच भूमिका असल्याने ही मागणी पूर्ण होईपर्यंत शेतकरी कामगार पक्ष स्वस्थ बसत नाही, असे दिसून येते.

मुंबई महाराष्ट्राला मिळाल्यानंतर संयुक्त महाराष्ट्राचा लढा थांबायला नको होता. बेळगाव, कारवार, निपाणी हा सीमाभाग महाराष्ट्रात आल्यानंतरच सीमालढा थांबवायला हवा होता. १९६० नंतर सीमाभाग महाराष्ट्रात आणण्यासाठी सर्व पातळीवरचे संघर्ष केले गेले आहेत. त्या संघर्षाला यश न आल्यामुळे सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय सीमाभागातील मराठी जनतेने, नेतृत्वाने व महाराष्ट्र सरकारने घेतला आहे. न्यायालयात हा दावा कर्नाटक सरकार व भारत सरकार यांच्या विरोधात दाखल केला आहे. अद्याप याचा निकाल लागलेला नाही. तर हा दावा दाखल केल्याचा परिणाम म्हणजे कर्नाटक सरकारने सीमाभागातील मराठी जनतेवरील अत्याचारात वाढ केली आहे. तसेच दुकानांच्या पाट्या, गाड्यांची तिकिटे, सातबारा उतारे, मराठी शाळा या सगळ्यांचे कानडीकरण सुरु केले आहे. या गोष्टींना विरोध करणारी भूमिका शेतकरी कामगार पक्षाने अलीकडच्या काळात घेतली आहे.

**मूल्यमापन:**

१९५६ पासून आजपर्यंत महाराष्ट्र - कर्नाटक सीमाप्रश्न सुरू आहे. तो सोडविण्यासाठी विविध मराठी भाषिक संघटना व शेतकरी कामगार पक्षाकडून आंदोलने झाली, ही आंदोलने शेतकरी कामगार पक्षाने बहुतांशवेळा स्वतंत्र व वेळप्रसंगी विविध राजकीय पक्षांना एकत्र घेऊन केली आहेत. तरीही गेली ६४ वर्ष हा प्रश्न न सुटल्यामुळे विविध राजकीय पक्षांनी, संघटनांनी व महाराष्ट्र सरकारने न्यायालयात दाद मागितली आहे. सर्वोच्च न्यायालयाने अद्याप या खटल्यावर निकाल दिलेला नाही. सीमा प्रश्नावरील या खटल्यात लक्ष ठेवण्यासाठी महाराष्ट्रातून एक 'उच्चाधिकार समिती' स्थापन करण्यात आली. त्यात श्री. शरद पवार, श्री. एन. डी. पाटील, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीचे अध्यक्ष यांचा समावेश आहे. ही उच्चाधिकार समिती सर्वोच्च न्यायालयात चालत असलेल्या खटल्यावर देखरेख ठेवणे तसेच वकिलांच्या अडचणी समजून घेऊन प्रशासकीय पातळीवर त्या सोडविणे अशा पद्धतीचे कार्य पाहते. म्हणजे आता सीमा प्रश्नाची सोडवणूक सर्वोच्च न्यायालयाकडून होणार आहे, असे दिसते.

**निष्कर्ष:**

शेतकरी कामगार पक्षाची महाराष्ट्र – कर्नाटक सीमा प्रश्नाविषयी भूमिका या प्रस्तुत शोधनिबंधाच्या मांडणीनंतर विविध निष्कर्ष समोर आले आहेत, त्याची मांडणी पुढीलप्रमाणे आहे.

१. शेतकरी कामगार पक्ष तालुका व जिल्हा पातळीवर महाराष्ट्र निर्मिती व सीमा प्रश्न सोडवणुकीसाठी कृती आराखडे तयार केले.
२. शेतकरी कामगार पक्षाने महात्मा गांधीजींच्या अहिंसक मार्गाचा वापर करून सीमा प्रश्नावर आंदोलने उभारली.
३. शेतकरी कामगार पक्षाने कर्नाटक सरकारच्या कानडीकरण धोरणास विरोध करणारी भूमिका घेतली आहे.
४. १९६७ मध्ये महाजन आयोगाच्या शिफारशीनुसार बेळगाव शहर, कारवार व सीमाभागातील ८६५ मराठी भाषिक गावे कर्नाटकातच राहणार होती, ही शिफारस महाराष्ट्राला मान्य न झाल्यामुळे सीमा प्रश्न सुरू झाला. तर तो अधिक तीव्र होण्याचे प्रमुख कारण म्हणजे, महाजन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यावर कर्नाटक सरकारने भर दिला आहे. तर महाराष्ट्र सरकारने या शिफारशी मान्य केल्या नाहीत. परिणामी सीमा संघर्ष अधिक तीव्र झाला आहे.

**शिफारशी:**

१. विविध संघटना व सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र येऊन संसदेवर सनदशीर मार्गाने आंदोलन करून सीमा प्रश्न सोडवावा.
२. केंद्र सरकारने सर्व राज्यांना आर्थिक, सामाजिक समता व स्वातंत्र्य मिळेल असे सर्वसमावेशक धोरण राबवावे. जेणेकरून राज्याराज्यांमध्ये सीमा प्रश्नावरून वाद निर्माण होणार नाही.
३. केंद्र सरकारची भूमिका पक्षपाती असू नये. केंद्र सरकारकडून योग्य ती भूमिका घेतली जावी.
४. सीमा भाषिकांनी आपले लढे सनदशीर मार्गाने व राष्ट्रीय तत्त्वांच्या चौकटीत मांडावेत.

**संदर्भ ग्रंथसूची:**

१. राष्ट्रवीर, साप्ताहिक, बेळगाव, ३० ऑक्टोबर १९६३, अंक ४७, पृष्ठ क्रमांक ४.
२. राष्ट्रवीर, साप्ताहिक, बेळगाव, ५ ऑक्टोबर १९६६, अंक २५, पृष्ठ क्रमांक १.
३. राष्ट्रवीर, साप्ताहिक, बेळगाव,१९ ऑक्टोबर १९६६, अंक २७, पृष्ठ क्रमांक १.
४. राष्ट्रवीर, साप्ताहिक, बेळगाव, १४ ऑक्टोबर २००१ पृष्ठ क्रमांक ३.
५. राष्ट्रवीर, साप्ताहिक, बेळगाव, ८ नोव्हेंबर २००६, अंक ३७, पृष्ठ क्रमांक ३.
६. राष्ट्रवीर, साप्ताहिक, बेळगाव, ३० ऑगस्ट २००६,अंक २७, पृष्ठ क्रमांक ४.
७. राष्ट्रवीर, साप्ताहिक, बेळगाव, १९ एप्रिल २००६, अंक ८, पृष्ठ क्रमांक १.